# थिबा संगीत महोत्सवाला आज रत्नागिरीत प्रारंभ

## संगीत क्षेत्रातील दिग्गज कलावंतांच्या पुढच्या पिढीचा कलाविष्कार

खास प्रतिनिधी, रत्नागिरी






रत्नागिरी शहराच्या सांस्कृतिक जीवनाचे अंग बनलेल्या थिबा संगीत महोत्सवाला आज (२२ जानेवारी) प्रारंभ होत आहे. भारतीय संगीताच्या क्षेत्रातील दिग्गज कलावंतांच्या पुढच्या पिढीचा कलाविष्कार हे यंदाच्या महोत्सवाचे खास वैशिष्ट्य आहे.

येथील थिबा राजवाड्याच्या प्रांगणात आर्ट सर्कलतर्फे आयोजित यंदाच्या कला महोत्सवाचे उद्‌घाटन 'लोकसत्ता'चे संपादक गिरीश कुबेर यांच्या हस्ते संध्याकाळी सात वाजता होणार आहे. त्यानंतर येत्या २४ जानेवारीपर्यंत रोज संध्याकाळी राहुल शर्मा (संतूर), अंकिता जोशी (शास्त्रीय गायन), निलाद्री कुमार (सतार वादन), कौशिकी चक्रवर्ती (शास्त्रीय गायन) आदी नव्या दमाचे आश्वासक कलाकार गायन-वादन सादर करणार आहेत.

आर्ट सर्कलच्या कार्यकर्त्यांनी गेली आठ वर्षे चिकाटीने प्रयत्न करून रत्नागिरीत जागतिक दर्जाच्या कलाकारांच्या कलाविष्काराचा आनंद देणारा हा महोत्सव उत्तम प्रकारे रुजवला आहे. दर वर्षी जानेवारी महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात होणाऱ्या या महोत्सवाची संगीताच्या क्षेत्रात राष्ट्रीय पातळीवर दखल घेतली गेली आहे.

यंदाच्या महोत्सवाच्या पहिल्या दिवशी (२२ जानेवारी) ख्यातनाम संतूरवादक पं. शिवकुमार शर्मा यांचे चिरंजीव राहुल यांचे संतूरवादन होणार असून, प्रसिद्ध तबलावादक रामदास पळसुले त्यांना साथ करणार आहेत. हिंदुस्थानी शास्त्रीय आणि पाश्चात्त्य



संगीताचा सुंदर मेळ साधत राहुल यांनी संतूरवादनात प्रयोग केले आहेत. पं. जसराज यांच्या शिष्या अंकिता जोशी यांचे शास्त्रीय गायन दुसऱ्या दिवसाचे मुख्य आकर्षण असून, त्यानंतर सतारवादक कार्तिककुमार यांचे चिरंजीव नीलाद्रीकुमार यांच्या सतारवादनाचाही कार्यक्रम होणार आहे. ते या घराण्याच्या सहाव्या पिढीतील वादक असून, त्यांचाही प्रवास अभिजात शास्त्रीय संगीतवादन ते स्वनिर्मित 'इलेक्ट्रिक झिटार' असा राहिला आहे.

कथ्थक नृत्याचे प्रणेते पं. गोपीकृष्ण यांचा पुतण्या विशालकृष्ण यांच्या नृत्याने महोत्सवाच्या अखेरच्या दिवसाच्या (२४ जानेवारी) कार्यक्रमांची सुरुवात होणार आहे. गेल्या अकरा पिढ्या संगीताचा वारसा चालवणाऱ्या सुखदेवमहाराज यांच्या घराण्यातील ते वंशज असून कथ्थक नृत्यकलाकार सितारादेवी यांचे शिष्य आहेत.

'गाणारे सौंदर्य' असे वर्णन केले जाणाऱ्या कौशिकी चक्रवर्ती यांच्या गायनाने या महोत्सवाची सांगता होणार आहे. पं. अजय चक्रवर्ती यांच्या कन्या असलेल्या कौशिकी यांना सत्यजित तळवलकर आणि अजय जोगळेकर संगीतसाथ करणार आहेत.

सकाळ

# 'थिबा संगीत महोत्सव'ला आजपासून प्रारंभ!

## गायन, वादन, नृत्याची पर्वणी | आंतरराष्ट्रीय कलावंतांचे होणार सादरीकरण

प्रतिनिधी
रत्नागिरी

'आर्ट सर्कल' आयोजित थिबा संगीत महोत्सव २२ ते २४ जानेवारी दरम्यान रंगणार आहे. या महोत्सवाचे हे सलग ९ वे वर्ष असून यावर्षीही आंतरराष्ट्रीय ख्यातीचे कलावंत शास्त्रीय संगीताद्वारे हा महोत्सव अविस्मरणीय करणार आहेत. विशेष म्हणजे यावर्षी महान कलावंतांची प्रतिभावान 'नेक्स्ट जनरेशन' महोत्सवात कला सादर करणार आहेत.

महोत्सवाचा शुभारंभ २२ रोजी सायंकाळी ७ वाजता ज्येष्ठ पत्रकार गिरीश कुबेर, आसमंत बेनेव्हलन्स फाऊंडेशनचे डायरेक्टर सुधीर गाडगीळ, नंदकुमार पटवर्धन यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी प्रख्यात संतूर वादक पं. शिवकुमार शर्मा यांचे सुपुत्र राहुल शर्मा यांच्या संतूर वादनाने होणार आहे. संतूरवादनासाठी त्यांना प्रसिद्ध तबलावादक रामदास पळसुले यांची साथ लाभणार आहे.

दुसऱ्या दिवशी २३ रोजी सायंकाळी ६.३०



राहुल शर्मा



रामदास पळसुले

वाजता प्रसिद्ध युवा गायिका अंकिता जोशी यांचे गायन होणार आहे. याच दिवशी सायंकाळी ७.३० वाजता सुप्रसिद्ध सतारवादक पं. कार्तिककुमार यांचे सुपुत्र निलाद्रीकुमार यांची सतार झंकारणार आहे.

महोत्सवाचा समारोप कथ्थक व शास्त्रीय गायनाने होणार आहे. २४ रोजी सायंकाळी ६.३० वाजता कथ्थक अध्वर्यु गोपीकृष्ण यांचा नातू विशाल कृष्णा कथ्थक नृत्याचे सादरीकरण करणार आहेत. महोत्सवाचा खऱ्याअर्थी समारोप 'गाणारं सौंदर्य' असं ज्यांचे वर्णन केले जाते त्या कौशिकी चक्रवर्ती

- महान कलावंतांची नवी पिढी महोत्सवात
- 'आर्ट सर्कल' आयोजित सलग ९ वे वर्ष
- २४ जानेवारीपर्यंत रंगणार महोत्सव

यांच्या गायनाने होणार आहे. त्यांना हार्मोनियमसाथ प्रसिद्ध हार्मोनियमवादक अजय जोगळेकर तर तबलासाथ प्रसिद्ध तबलावादक सत्यजित तळवलकर करणार आहेत. यावर्षी महान कलावंतांची प्रतिभावान 'नेक्स्ट जनरेशन' या महोत्सवात कला सादर करणार आहे.

**पहिल्या दिवशी विनामूल्य प्रवेश**

पहिल्या दिवशी 'कै. शंकरराव टेंकशे स्मृती शास्त्रीय संगीत सभा' आसमंत बेनेव्हलन्स आणि शरदराव पटवर्धन कुटुंबीय यांच्यातर्फे प्रायोजित केली आहे. रत्नागिरीतील तमाम संगीतप्रेमींना या सभेसाठी प्रवेश विनामूल्य आहे.

# थिबा संगीत महोत्सवाचे उद्घाटन...



रत्नागिरी : थिबा राजवाड्याच्या नेत्रदीपक पार्श्वभुमीवर आर्ट सर्कल आयोजित 'थिबा संगीत महोत्सव'चे उद्घाटन करताना प्रसिद्ध निवेदक सुधीर गाडगीळ, सोबत अर्थतज्ज्ञ गिरीश कुबेर, फिनोलेक्स इंडस्ट्रिजचे बोरकर, बँक ऑफ महाराष्ट्रचे रायकर, तसेच नंदकुमार पटवर्धन, उद्योजक दीपक गद्रे. (छाया-कांचन मालगुंडकर, रत्नागिरी)

लोकसत्ता

# भारतीय संगीतात अंतर्मुख करण्याची शक्ती - गिरीश कुबेर

**खास प्रतिनिधी, रत्नागिरी**

**पाश्चात्त्य संगीताच्या** तुलनेत भारतीय संगीतामध्ये गायक आणि श्रोत्यालाही अंतर्मुख करण्याची क्षमता असल्याचे प्रतिपादन 'लोकसत्ता'चे संपादक गिरीश कुबेर यांनी केले.

आर्ट सर्कल, रत्नागिरीतर्फे आयोजित नवव्या थिबा संगीत महोत्सवाचे उद्घाटन कुबेर यांच्या हस्ते काल संध्याकाळी झाले. प्रसिद्ध निवेदक सुधीर गाडगीळ, उद्योगपती दीपक गद्रे, जिंदाल कंपनीचे जनसंपर्क अधिकारी राजीव लिमये, नंदकुमार पटवर्धन इत्यादी मान्यवर या प्रसंगी उपस्थित होते. जगाला देण्यासारख्या ज्या काही गोष्टी आपल्या देशाकडे आहेत, त्यामध्ये संगीताचा प्राधान्याने समावेश करावा लागेल, असे मत व्यक्त करून कुबेर म्हणाले की, पाश्चात्त्य संगीत आणि भारतीय संगीत परंपरेची अनेकदा तुलना केली जाते. त्यामध्ये भारतीय संगीताचे वेगळेपण असे की, हे संगीत गायक आणि श्रोत्यालाही अंतर्मुख होण्यास प्रवृत्त करते. हे संगीत गाताना किंवा ऐकताना होणारी तल्लीनता हा एक वेगळा अनुभव मिळतो. भारतीय संगीताची विविध घराणी आणि कलाकारांनी ही क्षमता जपली आहे, वृद्धिंगत केली आहे. ख्यातनाम गायक कै. वसंतराव देशपांडे यांचा विशेष उल्लेख करत कुबेर यांनी त्यांच्या गायकीबरोबरच चिंतनक्षमतेबद्दल सोदाहरण गौरवोद्गार काढले.



भारतीय संगीताच्या क्षेत्रातील दिग्गज गायक-वादक कलाकारांच्या पुढच्या पिढीचा कलाविष्कार हे यंदाच्या महोत्सवाचे खास वैशिष्ट्य आहे. त्यानुसार काल उद्घाटन कार्यक्रमानंतर ख्यातनाम संतूरवादक पं. शिवकुमार शर्मा यांचे चिरंजीव राहुल यांनी बहारदार संतूरवादन सादर केले. प्रसिद्ध तबलावादक पं. रामदास पळसुले यांनी त्यांना साथसंगत केली.